नगर परिषद कार्यालय, यवतमाळ
सुधारित विकास परवानगी आदेश
आरंभ प्रमाणपत्र (COMMENCEMENT CERTIFICATE)

प्रकरण क्र. १०८१७०५०३०००५४

दिनांक.०३/०५/२०१७

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ आणि महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम १९६५ चे कलम १८९ (४) अन्वये याद्वारे

प्रति,

धारीवाल ॲन्ड छोरीया डेव्हलपर्स एल. एल. पी.
तर्फे भागीदार श्री. दिलीप देवीचंद जैन
रा. छोरीया ग्रुप कोठारी प्लॉझा पहिला मजला,
बीबेवाडी कोंडवा रोड लुक्का नगर पुणे-४४१०३७

कामाचे वर्णन

रहिवासी इमारतीचे बांधकाम करण्यास परवानगी मिळणेबाबत.
(या सोबतचे मंजूर नकाशाप्रमाणेच फक्तचे)

पुढील शर्तीस अधिन राहुन तात्पुरती परवानगी देण्यात आली आहे.

अ. क्र.

१) यवतमाळ शहराचा नझुल शिट क्र.....च्या नझुल प्लॉट क्रमांक.....आर. एम. धारीवाल ग्रीन्स धामणगांव रोड येथील रेव्हन्यु सर्व्हे नं.३०/१, ३०/२, ३०/३, ३०/४/२ च्या मंजुर अभिन्यासातील प्लॉट नं.१ वर यासोबतच्या मंजुर नकाशानुसार बांधकामाची जागेचा/इमारतीचा उपयोग रहिवासी करीता करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

२) मंजुर झालेल्या नकाशानुसारच जागेचा विकास करण्यात यावा त्यात नगर परिषदेच्या लेखी व स्पष्ट परवानगीवाचून कोणताही बदल करु नये.

३) संबंधीत जागेचा वर उल्लेखिल्याप्रमाणे विकास करण्यात ह्याप्रमाणे पत्रान्वये जी परवानगी देण्यात आली आहे. ती फक्त नगर रचनेच्या दृष्टीकोनातुन देण्यात आली आहे. सदर जागेवरील आवेदकाच्या मालकी हक्कास मंजुरी देण्यात आली असा या प्रमाणपत्राचा अर्थ नाही. किंवा तसा हक्क या परवानगीत हुकमामुळे आवेदकास प्राप्तही होऊ शकत नाही.

४) नगर परिषदेच्या जागेवर किंवा कोणत्याही रस्त्यावर, गल्लीत, सरकारी जागेवर, नझुल जागेवर अथवा कोणाच्या खाजगी जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करण्यात आल्यास त्या अतिक्रमणाची जबाबदारी अर्जदारावर राहील.

५) इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यावर त्या इमारतीच्या उपयोगासाठी महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम १९६५ चे कलम १९३ अनुसार मुख्याधिकारी नगर परिषद यवतमाळ यांची परवानगी मिळाल्याशिवाय सदर इमारतीचा वापर सुरु करु नये.

६) या प्रमाणे पत्रान्वये देण्यात आलेली परवानगी एक वर्षापर्यंत अंमलात राहील.

७) बांधकाम सुरु करण्यापुर्वी नगर परिषदेस लेखी कळवावे.

८) आपले प्लॉट मध्ये कमीत कमी पाच मोठी झाडे लावावीत.

९) नगर परिषदेचे थकीत कर असल्यास भरावे लागेल.

१०) बांधकाम मंजुर नकाशाच्या विरुद्ध जर करण्यात आले तर आपणा विरुद्ध महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ५३ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

(कृपया मागे पहा...)

११) या कार्यालयाचे संबंधीत अधिकारी जागेवर प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी आले असता त्यांचे अवलोकनार्थ मंजुरीचे संबंधीत कागदपत्र दाखविण्यात यावे.

१२) सहाय्यक संचालक नगर रचना यांचे परवानगीस अधिन राहुन नकाशा प्रमाणे बांधकामास प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१३) अर्जदाराने घर बांधकामा सोबत शौचालय (संडास) स्वत: चे खर्चाने बांधणे बंधनकारक राहील. तसेच नगर परिषदेने भुमीगत नाल्यांची व्यवस्था केल्यावर संडासचे व अन्य सांडपाणी नालीला मिळवावी लागेल.

१४) इमारतीचे बांधकाम या सोबतचे मंजुर नकाशा प्रमाणेच करावे मंजुर नकाशा विरुद्ध कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.

१५) इमारतीचे बांधकाम संबंधीच्या इतर सर्व बाबी ह्या बांधकाम उपविधी व विकास नियंत्रण नियमावली नुसार असाव्यात.

१६) बांधकामाचे मटेरीयल वा इतर टाकाऊ मटेरीयल न. प. रोडवर टाकु नये.

१७) आपल्या भुखंडा मध्ये जल संवर्धनाची स्वतंत्र व्यवस्था करावी.

१८) भुकंप प्रतिबंधक उपाय योजना कराव्यात व त्या प्रमाणे स्ट्रक्चरल इंजिनियर यांचे प्रमाणपत्र भोगवटा प्रमाणपत्र मागणी वेळेस सादर करावे.

१९) रुफ टॉप रेन वॉटर हार्वेस्टींगची व्यवस्था प्रस्तावीत करावी.

२०) कामगार उपकराची रक्कम सन २०१४ चे नोंदणी विभागातील बाजारमुल्य दर तक्त्यानुसार येणाऱ्या किंमतीवर वसुल केली आहे. शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. बीसी-२००९/प्रक्र. १०८/कामगार-७अ, दि. १७/१०/२०११ नुसार नोंदणी उपनिरिक्षक यांनी बांधकामाचे मुल्याबाबत तत्वे निर्गमीत केल्यानंतर बांधकामाच्या मुल्यात फरक पडल्यास कामगार उपकराची थकबाकी भरणे बंधनकारक राहील.

२१) यापुर्वी याच भुखंडावर देण्यात आलेली बांधकाम परवानगी क्र. डी. पी./४/२०१४-१५ दिनांक १५/०४/२०१४ व डी. पी./०९/२०१५-१६ दि. १६/०४/२०१५ मधील सर्व अटी व शर्ती कायम ठेवुन च्या संलग्नतेत सदरची परवानगी देण्यात येत आहे.

Municipal Council Yavatmal

नियोजन अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद, यवतमाळ

दिनांक :- ०७/१२/२०१७

प्र. क्र. डिपी/१०८२०१७०००००३५१५ अन्वये मंजुर झालेल्या नकाशाची प्रत व आदेश मिळाला.

युनिक कोड क्रमांक २०१७२८२७०४००३५१५

प्रतिलीपी :-

१) मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांना मंजुर नकाशाचे प्रतिसह माहितीसाठी सादर.

२) कर अधिक्षक, कर विभाग न. प. यवतमाळ

नियोजन अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद, यवतमाळ